**श्वान हॅप्पीच्या सेवानिवृत्ती बाबतचे प्रेस नोट**
**दि.** 03/12/2025

जळगाव जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेल्या **श्वान हॅप्पी** चा सेवानिवृत्तीचा म्हणून आजच एक नवीन श्वान **बेल्जिअम मेलिनॉइस जातीचा** ,65000/- **किंमतीचा गुन्हे शोधक कामाकरीता उत्कृष्ठ श्वान नामे "शौर्य"** हा श्वान पथक, जळगांव येथे दाखल झाला असून, श्वान **हॅप्पी** चा सेवानिवृत्तीचा व श्वान **शौर्य** याचा श्वान पथक जळगांव येथे दाखल असे दोन्ही कार्यक्रम आज रोजी **माननीय पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी सर**, मा. अप्पर पोलीस अधीक्षक **अशोक नखाते सर**, माननीय पोलीस उपअधीक्षक (गृह) **अरुण आव्हाड सर**, राखीव पोलीस निरीक्षक **सुगरवार सर**, पो.मु. जळगांव ,तसेच श्वान पथक व BDDS प्रभारी अधिकारी पो.उपनि. **देविदास वाघ सर** तसेच पोहेकॉ/534 **संदीप परदेशी**, पोहेकॉ/2861 **मनोज पाटील**, पोहेकॉ/1926 **निलेश झोपे**, पोना/910 **प्रशांत कंकरे** सर्व नेमणूक श्वान पथक जळगांव यांच्या उपस्थितीत पार पडला.

श्वान **हॅप्पी** यांचा जन्म 05/06/2015 रोजी झाला आहे. तसेच त्यांचे 9 **महिन्यांचे प्रशिक्षण** पुणे येथील गुन्हे अन्वेषण विभागात (CID Pune) पार पडलेले आहे.

श्वान **हॅप्पी** हा जळगाव जिल्हा पोलीस दलात 01/08/2015 पासून कार्यरत होता व त्याने आजपर्यंत खालील गुन्हे उघडकीस आणले असून तसेच विविध गुन्ह्यांमधील आरोपींचा शोध घेण्यास व आरोपींचा मार्ग काढणे कामी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

## श्वान हॅप्पी याने उघडकीस आणलेले गुन्हे

1 पो.स्टे. चे नाव – मुक्ताईनगर पोलीस स्टेशन (2016)
गु.र. नं.: 198/16
कलम – 427, 897, 34 भादंवि

2 पो.स्टे. चे नाव – रामानंद पोलीस स्टेशन (2018)
गु.र. नं.: 95/18
कलम – 363, 302, 201 भादंवि

3 पो.स्टे. चे नाव – यावल पोलीस स्टेशन (2019)
गु.र. नं.: 124/2019
कलम – 302 भादंवि

4 पो.स्टे. चे नाव – सावदा पोलीस स्टेशन (2020)
गु.र. नं.: 35/2020
कलम – 302 भादंवि

तसेच 62 वा अखिल भारतीय कर्तव्य मेळावा 2018 (लखनौ ,उत्तर प्रदेश ) मध्ये all India 5 वे स्थान मिळवुन महाराष्ट्र राज्याला चॅम्पियनशिप मिळवण्या मध्ये मोलाचा वाटा उचलला होता म्हणुन श्वान

हॅप्पी व नेमणुकीस असलेले पोलीस अंमलदार पोहेकॉ/ **संदीप परदेशी** व पोहेकॉ/ **मनोज पाटील** यांना मा. पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांनी **प्रत्येकी** 10,000/- **रुपये बक्षीस** दिले आहे.

हॅप्पीच्या सेवानिवृत्ती निमित्त जळगाव जिल्हा पोलीस दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करीत असून, त्यांच्या उज्ज्वल सेवेस सलाम!


करु शकतो?

